संगणक संकेतांक २०१२१०१११४३५२६६१२५

RNI No. MAHBIL/2009/31748
Reg. No. MH/MR/South-324/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ४, अंक ३०(२)] बुधवार, जुलै ४, २०१२/आषाढ १३, शके १९३४ [ पृष्ठे ३, किंमत : २०.००

असाधारण क्रमांक ९४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.

## नगरविकास विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जुलै २०१२

## अधिसूचना

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.**

क्रमांक एमएमसी. २०१२/२२३/प्र.क्र. ६८/२०१२/नवि-१४(२).—ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पद्धत) नियम, २०१० यामध्ये तातडीने सुधारणा करण्याची गरज उद्भवली आहे ;

आणि ज्याअर्थी, पूर्व प्रसिद्धीची शर्त काढून टाकणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबाबत महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) याचे कलम ९ च्या पोट-कलम (१) चे खंड (ब) व कलम ५१ (ब) चे पोट-कलम (२) व कलम ३२१ ची पोट-कलमे (१) व (२), यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून व त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि राज्य निवडणूक आयुक्त यांचेशी सल्लामसलत करून महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पद्धत) नियम, २०१० या मध्ये सुधारणा करीत आहे, ते असे :–

१. या नियमांना महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पद्धत) (सुधारणा) नियम, २०१२ असे म्हणावे.

२ महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पद्धत) नियम, २०१० नियमाच्या ५ मधील दुसऱ्या परंतुका नंतर पुढील परंतुके समाविष्ट करण्यात येतील, ते असे :—

" परंतु, आणखी असे की, मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडी किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ विचारात घेऊन नामनिर्देशित सदस्य म्हणून नामनिर्देशन करतांना महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याचे कलम ६३ च्या पोट-कलम (२ब)

यामधील तरतुदीनुसार बनविलेल्या मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळानुसार जिल्हाधिकारी, प्रथम नामनिर्देशित सदस्य म्हणून नामनिर्देशनासाठी पूर्णांक विचारात घेऊन अनुज्ञेय जागा ठरविल आणि त्यानंतरही जर एक किंवा अधिक जागा शिल्लक राहिल्यास अपूर्णांकामध्ये ज्या मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्षाची किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे संख्याबळ सर्वात जास्त आहे, तेथून सुरूवात करून उतरत्या क्रमाने उर्वरित जागांचे वाटप पूर्ण करेल:–

परंतु, आणखी असे की, वरील परंतुकात नमूद केल्यानुसार अपूर्णांकातील संख्याबळ उतरत्या क्रमाने विचारात घेऊन नामनिर्देशन करताना, जर दोन किंवा अधिक मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडीची किंवा फ्रंटची अपूर्णांकातील संख्या सारखीच असल्यास, जिल्हाधिकारी, अशा मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंटशी संबंधित नामनिर्देशित सदस्यांची निवड अशा सर्व संबंधित पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंटच्या उपस्थितीत चिठ्ठ्या टाकून करील. ”.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

आ. श्रा. जिवने,

शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 4th July 2012

*NOTIFICATION*

THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.

No. MMC. 2012 /223/CR-68/2012/UD-32(2).— Whereas, it is expedient to immediately amend the Maharashtra Municipal Councils and Nagar Panchayats (Qualifications and Procedure for Appointment of Nominated Councillors) Rules, 2010 ;

And whereas, the Government of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary to dispense with the condition of previous publication thereof.

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*b*) of sub-section (*1*) of section 9 and sub-section (*2*) of section 51B read with sub-section (*1*) and (*2*) of section 321 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 (Mah. XL of 1965) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, after consultation with the State Election Commissioner, hereby amends the Maharashtra Municipal Concils and Nagar Panchayats (Qualifications and Procedure for Appointment of Nominated Councillors) Rules, 2010, as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Municipal Councils and Nagar Panchayats (Qualifications and Procedure for Appointment of Nominated Councillors) (Amendment) Rules, 2012.

2. In rules of 5 of the Maharashtra Municipal Councils and Nagar Panchayats (Qualifications and Procedure for Appointment of Nominated Councillors) Rules, 2010, after the second proviso, the following provisos shall be inserted, namely :

" Provided also that, while nominating the persons as nominated Concillors on the basis of relative strengths of the recognized or registered parties or groups or aghadis or fronts, formed as per the provisions of sub-section (*2B*) of section 63 of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965, the Collector shall first consider the whole number of the seats admissible for nomination of persons as nominated Councillors to such recognized or registered parties or groups or aghadis or fronts, as per their relative strengths and thereafter if one or more seats remain to be allotted, the same shall be allotted to such recognized or registered parties or groups or aghadis or fronts, in the descending order of the fraction number, considering the highest fraction till all the seats of nominated Councillors are allotted :

Provided also that, while nominating the persons as nominated Councillors on the basis of the descending order of the fraction number, as mentioned in the above proviso, if two or more recognized parties or groups or aghadis or fronts have the same fraction number, then the Collector shall, nominate the names of persons belonging to such recognized or registered parties or groups or aghadis or fronts, selected on the basis of drawal of lots in the presence of all such concerned parties or groups or aghadis or fronts. ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. S. JIWANE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A,NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.